निशाणी क्रमांक ५ वरील आदेश
(दिनांक २३/०६/२०२६)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला असून दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्यांचेमार्फत इतर कोणीही वादीचे दावा मिळकतीचे चारही बाजुला कंपाऊंड करणेस हरकत अडथळा करु नये तसेच प्रतिवादीने वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अगर त्यांचे हक्कावर गदा येईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे.

दावा मिळकतीचे वर्णनः–

२. जिल्हा सोलापुर उपजिल्हा माळशिरस पैकी मौजे मांडवे येथील मिळकत खालीलप्रमाणेः

गट क्रं.	क्षेत्र हे. आर	आकार रु.पैसे
१०३०/४/अ	१.५६ पैकी ०.८१	२.१०
चतुसिमाः पुर्व – गट क्रं. १०३४, पश्चिम – गट क्रं. १०३०, दक्षिण – पंढरपुर पुणे महामार्ग, उत्तर – गट क्रं. १०३०/२ (कॅनॉल).		

(वर नमुद मिळकत यापुढे सोयीकरीता ‘दावा मिळकत’ असे संबोधण्यात येत आहे.)

वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–

३. दावा मिळकत ही वादीच्या वडीलापार्जीत मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची असुन त्याच्या पश्चिम–उत्तर बाजुस गट क्रं. १०३०/२ ही प्रतिवादीची मिळकत असुन तो वादीचा बांधकरी आहे. सन २००३ साली वादी व प्रतिवादीने एकत्रीतरित्या संमतीने व शेतीमहामंडळ यांनी स.क्रं. २७/०३ या संपुर्ण सर्व्हे नंबरची मोजणी केलेली व त्याची फाळणी होवुन गट क्रं. १०३०/४/अ या पोटहिश्यासोबत हद्दीखुणा निश्चित केलेल्या आहेत. वादी हा सेवानिवृत्त असुन तो पुणे येथे मुलांसोबत राहणेस असुन मौजे मांडवे येथे येवुन जावुन शेती करीत आहे. याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी वादीचे कब्जास हरकत अडथळा करीत आहे. वादीने सन २०२१–२०२२ मध्ये मे. जे.एम.म्हात्रे अण्ड कंपनी यांना आळंदी–पुणे–पंढरपुर–मोहोळ या राष्ट्रीय महामार्ग ९६५ चे चौपदीकरणाचे कामासाठी सर्व प्रकारचे वाहनांच्या वाहतुकीकरीता वादीचे हिश्याचे क्षेत्र दोन वर्षाचे करारावरती नोटरीदस्ताने सदरची शेतजमीन भाडेपट्टयाने दिलेली होती. सदरचा करार संपुष्टात आलेला असुन त्याबाबत त्यांना रितसर कायदेशीर नोटीस पाठवुन सदर मिळकत रिकामी करणेकामी समज दिलेली होती, त्यानुसार त्यांनी दावा मिळकतीचा ताबा सोडलेला आहे.

४. वादी पुढे कथन करतो की, दरम्यानच्या काळात मे. म्हात्रे अण्ड कंपनी यांचा वादीशी कसलाही कोणताही संबंध राहिलेला नसताना प्रतिवादीने वादीची कोणतीही पुर्व परवानगी न घेता मे. खत्री अण्ड कंपनी यांचेबरोबर वादीचे अपरोक्ष जानेवारी २०२५ मध्ये रस्त्याचे करार करुन दावा मिळकत गट क्रं. १०३०/४/अ या गटाचा वापर डांबर वाहुन नेण्यासाठी रस्ता म्हणुन वापर करु लागले. त्यावेळी वादीने प्रतिवादीस जाब विचारले असता ''आम्ही खत्री कंपनीसोबत केलेला करार बंद करणार नाही, तु इथे राहत नाहीस'' असे म्हणुन तेथुन वादीस हुसकावुन लावले. त्यानंतर दिनांक २८/०५/२०२५ रोजी वादीने वाहतुक बंद करणेकरीता दावा मिळकतीमध्ये चारी खांदली होती. परंतु प्रतिवादीने ती चारी बुजवुन टाकली. त्यानंतर दिनांक २९/०६/२०२५ रोजी वादीने दावा मिळकत विट्ट भट्टीकरीता भाडयाने देणेसाठी सिमेंटचे खांब रोवलेले असताना प्रतिवादीने सदर खांब उखड्डुन काढुन खड्डे बुजविले. वादीने प्रतिवादीस दावा मिळकत वाड वडीलांपासुन कब्जेवहिवाट करीत असल्याचे सांगितले असता प्रतिवादीने ''तुझा या जमीनीशी काहीएक संबंध नाही ही जमीन माझी आहे, तु इथुन निघुन जा'' असे म्हणुन दमदाटी करुन कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी दिनांक ०५/०७/२०२५ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली आहे. त्यानंतरही प्रतिवादीने वादीचे दावा

मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस जास्त हरकत अडथळा करु लागले. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान होत आहे. त्याकरीता प्रस्तुत अर्ज मंजुर होवुन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

प्रतिवादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–

५. प्रतिवादीने दाव्यात हजर होवुन निशाणी क्रं. १२ वर कैफियत व म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतो की, गट क्रं. १०३०/४ मध्ये पश्चिम बाजुचे ०.८१ आर ही वादीच्या वाटणीचे व पश्चिम बाजुचे ०.८१ आर क्षेत्र वादीचा भाऊ शरद यांचे वाटणीचे आहे. वादीचा भाऊ शरद याने पुर्व बाजुचे ०.०६ आर क्षेत्र जितेंद्र शरदराव इंगोले व उर्वरित ०.७५ आर क्षेत्र ललिता दुर्योधन काळोखे वगैरे यांना खरेदी दिले आहे व सडक परिवहन राज्य मंत्रालय भारत सरकार यांना ० हे ०.०२२ क्षेत्र संपादित झालेले आहे व मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापुर यांचेकडे ० हे ००.०९ हे क्षेत्र त्यांचे नावे आहे. प्रस्तुत दाव्यास त्यांना पक्षकार केल्याशिवाय अर्ज चालणार नाही. त्यास नॉन जॉईडंर ऑफ नेसेसरी पार्टीस ची बाधा येते. प्रतिवादीने दाखल केलेला कच्चा नकाशा कैफियतीचा भाग समजणेत यावा अशी विनंती केलेली आहे. दावा मिळकतीपैकी ० हे ००.२२ आर सडक

परिवहन ० हे ००.०९ आर एकुण ३१ चौ. फुट क्षेत्र संपादित झाले आहे ते क्षेत्र वादीच्या दावा मिळकतीमधुन कमी होणार आहे. वादीस दावा मिळकतीची मालकी नसताना प्रस्तुत दावा व अर्जातील मागणी करता येणार नाही. वादीचे वडील व इतर लोकांनी चितळे अग्रो कल्चरल या कंपनीस भाडेपट्टयाने जमिनी दिलेल्या होत्या. त्यानंतर कंपनीची महाराष्ट्र कमाल जमीन धारण कायदयातील तरतुदीप्रमाणे चौकशी होवुन जमीनी सरकार जमा करण्यात आल्या.

६. प्रतिवादी पुढे कथन करतो की, त्यानंतर वादी व प्रतिवादीने मे. स्पेशल डेप्युटी कलेक्टर लॅन्ड सिलिंग माळशिरस यांचेकडुन हु.नं.क्रं.बी.एल.जी. ९५७ माळशिरस ता. ०१/१२/१९७५ ला आदेश क्रमांक/आय.सी.एच./१३७१/ ६४८७१ एल ता. २९/०६/१९७२ प्रमाणे भुतपुर्व खंडकरी यांना महाराष्ट्र शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१ चे तरतुदीनुसार वादीचे वडील वासुदेव कुलकर्णी यांना स.क्रं. ३०४/४ त्याचा गट बांधणी नंतरचा गट क्रं. १०३०/४ क्षेत्र १.६२ हे.आर आकार २.१० रु.पैसे वाटप करणेत आल्या. वादीने केलेले कथनाप्रमाणे सर्व्हे नंबरची मोजणी केलेचा फाळणी केलेचा हद्दीखुणा केलेचा मजकुर खोटा असुन त्यास प्रतिवादीने कधीही समंती दिलेली नाही. वादीचा अर्ज

मंजुर केल्यास प्रतिवादीचे न्याय व कायदेशीर हक्क डावलला जाणार आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करणेची विनंती केलेली आहे.

७. वादी व प्रतिवादीच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन पुढील मुद्दे माझ्या समक्ष उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

अ.क्र.	**मुद्दे**	**उत्तर**
१.	वादी सकृत दर्शनी केस त्याच्या बाजुने आहे, हे सिद्ध करतो का?	**होय**
२.	न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे, हे वादी सिद्ध करतो का?	**होय**
३.	अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी सिद्ध करतो का?	**होय**
४.	अंतिम आदेश काय?	**अर्ज मंजुर करण्यात येतो.**

कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ ते ३ करीताः–

८. मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी सलंग्न असल्याने चर्चेची वांरवांरता टाळण्याकरीता तिन्हीं मुद्दयांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवित आहे. वादीचे विद्वान वकिलांचा सखोल युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्जानुसार सखोल युक्तीवाद केला. प्रतिवादी तर्फे विधिज्ञांनी त्याच्या म्हणणेप्रमाणे युक्तीवाद केला. मी अर्ज व सर्व कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला.

९. वादीच्या कथनांनुसार दावा मिळकत ही सन २०२१–२०२२ मध्ये मे. जे.एम.म्हात्रे अण्ड कंपनी यांना आळंदी–पुणे–पंढरपुर–मोहोळ या राष्ट्रीय महामार्ग ९६५ चे चौपदीकरणाचे कामासाठी सर्व प्रकारचे वाहनांच्या वाहतुकीकरीता वादीचे हिश्याचे क्षेत्र दोन वर्षाचे करारावरती नोटरीदस्ताने सदरची शेतजमीन भाटेपट्टा करारनामाने दिलेली होती. सदरचा करार संपुष्टात आलेला असुन त्याबाबत त्यांना रितसर कायदेशीर नोटीस पाठवुन सदर मिळकत रिकामी करणेकामी समज दिलेली होती, त्यानुसार त्यांनी दावा मिळकतीचा ताबा सोडलेला आहे. दरम्यानच्या काळात

मे. म्हात्रे अण्ड कंपनी यांचा वादीशी कसलाही कोणताही संबंध राहिलेला नसताना प्रतिवादीने वादीची कोणतीही पुर्व परवानगी न घेता मे. खत्री अण्ड कंपनी यांचेबरोबर वादीचे अपरोक्ष जानेवारी २०२५ मध्ये रस्त्याचे करार करुन दावा मिळकत गट क्रं. १०३०/४/अ या गटाचा वापर डांबर वाहुन नेण्यासाठी रस्ता म्हणुन वापर करु लागले. त्यावेळी वादीने प्रतिवादीस जाब विचारले असता ''आम्ही खत्री कंपनीसोबत केलेला करार बंद करणार नाही, तु इथे राहत नाहीस'' असे म्हणुन तेथुन वादीस हुसकावुन लावले.

१०. त्यानंतर दिनांक २८/०५/२०२५ रोजी वादीने वाहतुक बंद करणेकरीता दावा मिळकतीमध्ये चारी खांदली होती. परंतु प्रतिवादीने ती चारी बुजवुन टाकली. त्यानंतर दिनांक २९/०६/२०२५ रोजी वादीने दावा मिळकत विट्ट भट्टीकरीता भाडयाने देणेसाठी सिमेंटचे खांब रोवलेले असताना प्रतिवादीने सदर खांब उखड्डुन काढ्ढुन खड्डे बुजविले. वादीने प्रतिवादीस दावा मिळकत वाड वडीलांपासुन कब्जेवहिवाटीत असल्याचे सांगितले असता प्रतिवादीने ''तुझा या जमीनीशी काहीएक संबंध नाही, ही जमीन माझी आहे, तु इथुन निघुन जा'' असे म्हणुन दमदाटी करुन कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीस दिनांक

०५/०७/२०२५ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली आहे. त्यानंतरही प्रतिवादीने वादीचे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस जास्त हरकत अडथळा करु लागले.

११. याउलट प्रतिवादीने केलेल्या कथनाप्रमाणे, गट क्रं. १०३०/४ मध्ये पश्चिम बाजुचे ०.८१ आर ही वादीच्या वाटणीचे व पश्चिम बाजुचे ०.८१ आर क्षेत्र वादीचा भाऊ शरद यांचे वाटणीचे आहे. वादीचा भाऊ शरद याने पुर्व बाजुचे ०.०६ आर क्षेत्र जितेंद्र शरदराव इंगोले व उर्वरित ०.७५ आर क्षेत्र ललिता दुर्योधन काळोखे वगैरे यांना खरेदी दिले आहे व सडक परिवहन राज्य मंत्रालय भारत सरकार यांना ० हे ०.०२२ क्षेत्र संपादित झालेले आहे व मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापुर यांचेकडे ० हे ००.०९ हे क्षेत्र त्यांचे नावे आहे. प्रस्तुत दाव्यास त्यांना पक्षकार केल्याशिवाय अर्ज चालणार नाही. त्यास नॉन जॉईडंर ऑफ नेसेसरी पार्टीस ची बाधा येते. दावा मिळकतीपैकी ० हे ००.२२ आर सडक परिवहन ० हे ००.०९ आर एकुण ३१ चौ. फुट क्षेत्र संपादित झाले आहे ते क्षेत्र वादीच्या दावा मिळकतीमधुन कमी होणार आहे. वादीस संपुर्ण दावा मिळकतीची मालकी नसताना प्रस्तुत दावा व अर्जातील मागणी करता येणार नाही.

१२. वादीचे वडील व इतर लोकांनी चितळे अग्रो कल्चरल या कंपनीस भाडेपट्टयाने जमिनी दिलेल्या होत्या. त्यानंतर कंपनीची महाराष्ट्र कमाल जमीन धारण कायदयातील तरतुदीप्रमाणे चौकशी होवुन जमीनी सरकार जमा करण्यात आल्या. त्यानंतर वादी व प्रतिवादीने मे. स्पेशल डेप्युटी कलेक्टर लॅन्ड सिलिंग माळशिरस यांचेकडुन हु.नं.क्रं.बी.एल.जी. ९५७ माळशिरस ता. ०१/१२/१९७५ ला आदेश क्रमांक/आय.सी.एच./१३७१/ ६४८७१ एल ता. २९/०६/१९७२ प्रमाणे भुतपुर्व खंडकरी यांना महाराष्ट्र शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१ चे तरतुदीनुसार वादीचे वडील वासुदेव कुलकर्णी यांना स.क्रं. ३०४/४ त्याचा गट बांधणी नंतरचा गट क्रं. १०३०/४ क्षेत्र १.६२ हे.आर आकार २.१० रु.पैसे वाटप करणेत आल्या. तसेच गट क्रं. १०३०/१, १०३०/२ व १०३०/३ या देखील त्यावेळी भुतपुर्व खंडक–यांना देणेत आल्या होत्या. वादीने केलेले कथनाप्रमाणे सर्व्हे नंबरची मोजणी केलेचा फाळणी केलेचा हद्दीखुणा केलेचा मजकुर खोटा असुन त्यास प्रतिवादीने कधीही संमती दिलेली नाही.

१३. सदर मुद्दयाकरीता प्रतिवादीतर्फे विधिज्ञ **Sou. Godavaribai Purushottam Bawaskar Vs. Sitaram Bhagwan Paithane & Others,**

2020(2) ALL M.R. 156 या न्यायनिर्णयावर विसंबुन राहुन युक्तीवाद केला की, दावा मिळकतीचे वर्णन खरेदीखताप्रमाणे अथवा वस्तुस्थितीप्रमाणे दाव्यामध्ये नमुद न केल्यास दावा चालणेस पात्र नाही. तसेच **Naganna Vs. Sidda Ramegowda, 2025(4) ALL M.R. 427 SC.** या न्यायनिर्णयावर विसंबुन राहुन युक्तीवाद केला की, केवळ रेव्हन्यु रेकॉर्डमधील कागदपत्रानुसार दावा मिळकतीची मालकी सिद्ध करता येणार नाही. वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे न्याय व कायदेशीर हक्क डावलला जाणार आहे.

१४. वादी व प्रतिवादीचा युक्तीवाद ऐकला. वादीने त्याच्या कथनाच्या अनुषंगाने निशाणी क्रं. ४/१ वर गट क्रं. १०३०/४/अ याच्या ७/१२ उता–याची प्रत तसेच मो.र.क्रं.२६/०३ मधील मोजणी नकाशा दाखल केलेले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे तसेच गट क्रं. १०३०/४/अ च्या ७/१२ उता–यानुसार क्षेत्र ०.८१ हे.आर करीता वादीच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येते. याउलट प्रतिवादीने गट क्रं. १०३०/४ मधुन विक्री केलेले क्षेत्र तसेच सडक परिवहन महामंडळातर्फे संपादित केलेले क्षेत्र वगळले नसल्याने वादीस प्रतिवादी विरुध्द मनाई मागता येणार नाही असे कथन केलेले आहे. परंतु गट क्रं. १०३०/४ हा पुर्वी वादी व वादीचा भाऊ शरद

यांच्यादरम्यान वाटणी झालेला आहे. त्यानुसार गट क्रं. १०३०/४/अ हा वादीच्या हिश्यास व गट क्रं. १०३०/४/ब वादीचा भाऊ शरद याच्या हिश्यास आलेला होता. त्याप्रमाणे वादीने गट क्रं. १०३०/४/अ चा ७/१२ उतारा निशाणी क्रं. ४ लगत दाखल केलेला आहे. प्रतिवादीने दावा मिळकत त्याच्या कब्जेवहिवाटीत असलेबाबत कथन केलेले आहे. परंतु प्रथमदर्शनी प्रतिवादीची दावा मिळकतीवर कब्जेवहिवाट असलेबाबत कोणताही प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही वादीच्या कब्जेवहिवाटीत आहे. तसेच सदर कब्जेवहिवाटीस प्रतिवादी हरकत अडथळा करत असलेबाबत शपथेवर सांगितलेले आहे. प्रतिवादीने त्याच्या म्हणण्यामध्ये दावा मिळकत गट क्रं. १०३०/४/अ ही त्याच्या मालकीची असलेबाबत कथन केलेले नाही. यावरुन गट क्रं. १०३०/४/अ हा वादीच्या वादीच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते.

१५. प्रतिवादी तर्फे दाखल ***<u>Sou. Godavaribai (Cited Supra)</u>*** व ***<u>Naganna (Cited Supra)</u>*** या न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, सदर न्यायनिर्णयातील कथने व प्रस्तुत न्यायनिर्णयातील कथने भिन्न असल्याचे दिसते. त्यामुळे न्यायनिर्णयातील कथने दाव्याच्या या टप्प्यावर विचारात घेता येणार नाही.

प्रस्तुत दावा हा प्राथमिक टप्प्यावर असुन संपुर्ण पुराव्याअंती दावा गुणदोषावर निर्णयित होणार आहे. तसेच वादीने मे. म्हात्रे कंपनीस करुन दिलेल्या भाडेपट्टयाचे करारनाम्याच्या प्रती निशाणी क्रं. १८ खाली दाखल केलेल्या आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने दावा मिळकत म्हात्रे कंपनीस सन २०२२ पर्यत भाडेपट्टयावर दिली असल्याचे दिसुन येते. त्यानंतर दावा मिळकत कब्जेत मिळणेकरीता वादीने म्हात्रे कंपनीस नोटीस पाठविलेली आहे व दावा मिळकतीचा कब्जा म्हात्रे कंपनीने वादीस दिला असल्याने ती वादीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे स्पष्ट होते.

१६. सदयस्थितीत दावा मिळकत ही वादीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच दाखल कागदपत्रांच्या आधारे दावा मिळकत ही वादीच्या नावे असल्याचे देखील स्पष्ट होते. वादीचा दावा मिळकतीमधील कब्जा सुरक्षित केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

१७. वर नमुद कथने व कागदपत्रांनुसार प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने आहे हे वादीने शाबीत केलेले आहे. शिवाय न्यायाचा तराजु देखील वादीच्या बाजुने आहे. तसेच वादीचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ४ बाबतः–

१८. वरील मुद्दे क्र.१ ते ३ यांची कारणमिमांसा विचारात घेतली असता वादीची प्रथमदर्शनी केस त्याच्या बाजूने आहे हे सिध्द केले आहे. तसेच न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने असल्याचे देखील सिध्द केलेले आहे. अर्ज नामंजूर केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल हे देखील सिध्द केले आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ च्या कारणमिमांसा अन्वये सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. निशाणी क्रं. ५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीस निर्देशित करणेत येते की, दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो त्याने स्वतः अगर त्यांचेतर्फे इतर कोणीही वादीचे दावा मिळकतीचे चारही बाजुला कंपाऊंड करणेस तसेच वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच वादीचे कब्जे वहिवाटीस अडथळा येईल अगर त्यांचे हक्कावर गदा येईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी तूर्तातूर्त मनाई हुकूम देणेत येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.06.23 17:51:29 +0530

दि.२३/०६/२०२६

(आदित्य अ. व्यास)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
माळशिरस.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court :2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C
Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 23-06-2026

(d) Order uploaded on : 23-06-2026